An International Multidisciplinary Half Yearly Research Journal

# GENIUS

ISO 9001:2008 QMS
ISBN / ISSN

Volume - VI, Issue - I, August - January - 2017-18
ISSN 2279-0489
Impact Factor - 4.248 (www.sjifactor.com)

Is Hereby Awarding This Certificate To

प्रा. डॉ. खिस्ते ओंकार बाळकृष्ण

An Recognation of the Publication of the Paper Entitled

आर्थिक विकासात लघु वित्ताची भूमिका

Editor : Vinay S. Hatole

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Ajanta Prakashan
Jaisingpura, Near University Gate,
Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No. 9579260877, 9822620877
Tel. No.: (0240) 2400877,
ajanta1977@gmail.com, www.ajantaprakashan.com

ISSN 2279-0489

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY HALF YEARLYRESEARCH JOURNAL

# GENIUS

VOLUME - VI ISSUE - I AUGUST - JANUARY- 2017-18 AURANGABAD

***Peer Reviewed Referred and UGC Listed***

***Journal No. 47100***

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

| IMPACT FACTOR / INDEXING |
| --- |
| 2016 **-4.248** |
| **www.sjifactor.com** |

✦ EDITOR ✦

**Assit. Prof. VinayShankarraoHatole**

M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

✦ PUBLISHED BY ✦

**Ajanta Prakashan**
**Aurangabad. (M.S.)**

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | **प्रा. डॉ. विनायक पवार** | संत तुकारामांच्या साहित्यातील सामाजिकता | ११८-१२१ |
| २७ | **प्राचार्य डॉ. गजानन जाधव** | मराठी भाषा व साहित्यातील संशोधनाच्या नव्या दिशा | १२२-१२४ |
| २८ | **डॉ. स्मिता शिंदे** | उपयोजित इतिहास आणि मूर्तिशास्त्र | १२५-१२९ |
| २९ | **प्रा. डॉ. खिस्ते ओंकार बाळकृष्ण** | आर्थिक विकासात लघु वित्ताची भूमिका | १३०-१३३ |
| ३० | **श्रीकांत दत्तात्रय तनपुरे** | लोकगीतांचा सामाजिक व वाङमयीन अभ्यास | १३४-१३७ |
| ३१ | **डॉ. विनोद राऊत** | नामदेव ढसाळांच्या कवितेचा घाट | १३८-१४२ |


**'जिनिअस'** या सहामयि प्रसिध्द झालेली मते मुख्य संपादक, संपादक मंडळ व सल्लागार मंडळास मान्य असतीलच असे नाही. या नियतकालिकात प्रसिध्द करण्यात आलेली लेखकाची मते ही त्याची वैयक्तिक मते आहेत. तसेच शोध निबंधाची जबाबदारी स्वत: लेखकावर राहील.

हे नियत कालिक मालक, मुद्रक, प्रकाशक विनय शंकरराव हातोले यांनी अजिंठा कॉम्प्युटर अँण्ड प्रिंटर्स, जयसिंगपूरा, विद्यापीठ गेट, औरंगाबाद येथे मुद्रित व प्रकाशित केले.

२९

# आर्थिक विकासात लघु वित्ताची भूमिका

**प्रा. डॉ. खिस्ते ओंकार बाळकृष्ण**
अर्थशास्त्र विभाग, श्री संत गजानन महाविद्यालय, खर्डा, ता. जामखेड, जि. अहमदनगर.

**ब्रिज संज्ञा:** लघुवित, आर्थिक विकास, लाघुविताचा उदय, लाघुविताचे महत्व.

**प्रस्तावना**

भारताने स्वातंत्र्योत्तर काळात नियोजन आणि आर्थिक विकास यांची सांगड घातलेली दिसून येते. यासाठी विविध साधनांचा उपयोग कालानुरूप करण्यात आलेला दिसून येतो. की ज्याच्या द्वारे समाजातील जे घटक उपेक्षित राहिले आहेत त्यांनाही विकासाच्या प्रक्रियेत सामावून घेतले जाईल. देशाचा आर्थिक विकासाचा वृद्धी दर वाढताना सर्वसामान्यांचा विकास होणे महत्त्वपूर्ण उरते तेव्हाच सर्व समावेशक विकासाची संकल्पना साध्य होईल ! राजकीय अंगाने विचार केला तर आजपर्यंत देश स्वतंत्र झाल्यापासून अनेक योजना, धोरणे, उपाय करण्यात आलेले दिसून येतात. परंतु त्यांची अंमलबजावणी अकार्यक्षमपणे झाल्याने आणि त्यास भ्रष्टाचाररुपी कीड लागल्याने त्यांचा फायदा उपेक्षीत्तर लोकांना (राजकीय हितसंबंधी) झालेला दिसून येतो. जर या योजना कार्यक्षमपणे राबवल्या गेल्या असत्यातर दारिद्र्य, बेरोजगारी, आत्महत्या, गुन्हेगारी यासारख्या समस्या निर्माण झाल्या नसत्या. परंतु वाढती लोकसंख्या त्यांना हव्यातेवढ्या प्रमाणात रोजगार निर्मिती न झाल्याने सामाजिक, आर्थिक, राजकीय समस्या डोके वर काढू लागल्या आणि अशा बिकट परिस्थितीतून देशाला बाहेर काढण्यासाठी लघुवित्तांची संकल्पना उदयाला आली. ज्याचा उद्देश कृषीक्षेत्र, कुटीर उद्योग, यासारख्या दुर्बल क्षेत्रांना अल्प व्याजदराने, कमी प्रमाणात वित्त पुरवठा करणे हा होतो. जेणे करुन समाजातील उपेक्षित, दुर्बल, वंचीत घटकांना विकासाच्या प्रवाहात सामावून घेणे शक्य होईल. या घटकांचाही विकास होईल आणि पर्यायाने देशाचा सर्व समावेशक व सर्वांगीण विकास होईल आणि या सर्व पार्श्वभूमीला समोर ठेवून 'लघुवित्तांची भूमिका महत्त्वपूर्व ठरते.'लघू उद्योगलघुवित्ताची संकल्पना ही अतिशय व्यापक असताना दिसून येते. या अंतर्गत फक्त बचत गटांचाच समावेश होतो असे नाही तर याशिवाय लघू उद्योग, कुटीरउद्योग, तसेच समाजातील इतर उपेक्षित, दुर्बल घटकांना करण्यात येणारा वित्त पुरवठा अंतर्भूत होताना दिसतो. लघुवित्तांतर्गत बचत गटाथी भूमिका महत्वपूर्ण असताना दिसून येते. कारण यामुळे बहुतांश महिला आर्थिक, सामाजिकदृष्ट्या सक्षम झालेल्या दिसून येतात. तेव्हा लघू वित्ताची भूमिका सुद्धा अत्यंत महत्त्वपूर्ण आणि अतिशय व्यापक असताना दिसून येते.

लघू वित्ताचा अर्थ

"लघुवित्त ही अशी तरतूद आहे की ज्या अंतर्गत निम्न उत्पन्न गटातील व्यक्ती, उद्योजक यांना वित्त पुरवठा करण्यात येतो. तसेच या अंतर्गत, बचती, कर्ज, विमा, मुद्रासंक्रमण यासारख्या घटकांचाही समावेश होतो."

लघू वित्ताची पार्श्वभूमी

"लघू वित्तांतर्गत बचत गट, हा प्रमुख घटक आहे. ज्याचा जन्म हा महंमद युनुस यांच्या नेतृत्त्वाखाली बांगलादेशात झालेला दिसून येतो. याच कार्यासाठी त्यांना नोबेल पुरस्कार प्राप्त झालेला दिसतो. या बचतगटांना लघू वित्त पुरवठा करण्यात आला आणि यातून बांगलादेशाचे पूर्ण चित्रच पालटून गेले आणि जगा समोर एक आदर्श प्रतिमाण निर्माण झाले ज्याचे अनुकरण अनेक देशांनी केलेले दिसून येते." भारताच्या संदर्भात लघुवित्ताची संकल्पना ही १९८५ साली उदयाला आलेली दिसून येते. सर्वसामान्यपणे भारतातील वित्त पुरवठ्याचे जाचक, नियम, अटी, त्यासाठी आवश्यक असणारे कागदपत्रे या सर्व कारणां मुळे कर्ज पुरवठ्यास योजनेला सुद्धा वेळ लागतो. तसेच असंघटित क्षेत्रातील घटकांकडून जो कर्ज पुरवठा होतो त्यातून ऋणकोची फसवणूक होताना दिसते. त्यातून आत्महत्याचे प्रमाणही वाढताना दिसून येते. यासारख्या प्रतिकूल घटकांना फाटा देऊन त्याठिकाणी अनुकूल परिस्थिती निर्माण होण्यासाठी लघू वित्त महत्त्वपूर्ण ठरले. याच संदर्भात १९९० नाबार्डने आणि अंतर सिडबीने सुद्धा महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली. लघुवित्ताची मागणी कामगिरी पाहता २००५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय लघुवित्त वर्ष म्हणून साजरे करण्यात आले होते.

स्वयंसहाय्यता गटास लघुवित्त पुरवठा

स्वयंसहाय्यता गटांच्या आकडेवारी मध्ये आणि वित्तपुरवठ्याच्या प्रमाणात सुद्धा वाढ होताना दिसुन येत आहे. जे की लघुवित्ताची गरज आणि महत्त्व दोन्ही निर्देशीत करते. २०००-२००१ साली स्वयं सहाय्यता गटांची संख्या १,४९,०५० एवढी होती ती २००८-२००९ या वर्षी १६,०९,५८६ एवढी झाली. ही संख्या २००० - २००१ वर्षाच्या तुलनेत १०.७९ पटीने वाढलेली दिसते तर या गटांना जो वित्त पुरवठा करण्यात आला तो २०००-२००१ साली १३५.९१ कोटी रु. होता तर २००८-२००९ साली १२,२५३.५१ कोटी झाला. २०००-२०११ च्या तुलनेत कर्ज पुरवठ्यात २००८-२००९ साली ९०.१५ पटीने वाढ झाली. २०१५-१६ या वर्षात रुपये ४,४३,७९ हजाराणे वाढ झाली. याचाच अर्थ असा होतो की बचतगटाच्या अंतर्गत लघू वित्तासाठी मागणी वाढत आहे आणि वित्तीय संस्थांकडून कर्जपुरवठा सुद्धा वाढताना दिसतो. कारण कर्जाची व परतफेड कार्यक्षमपणे होते यामुळे वित्तीय संस्थांची ग्राहकावरील विश्वासनीयता वाढलेली दिसते.

लघूवित्ताचे महत्त्व

लघू वित्ताचे महत्त्व आर्थिक, सामाजिक तसेच राजकीय पातळीवरील महत्त्वपूर्ण असताना दिसून येते. की ज्याद्वारे आर्थिक स्थिरतेसह विकास साध्य करता येईल. सदर परिस्थितीचा विचार दिसून येतो.

तर महाराष्ट्राची लोकसंख्या ही ११.२ कोटी झालेली दिसते. (९.१ नी वाढ) भारताच्या लोकसंख्येत ५१.५४% उर्वरित ४८.४६% एवढ्या स्त्रीया आहेत. दारिद्र्याचे प्रमाण २६% होते. (लक्कडवाला सुत्रानुसार) यासारख्या समस्यातून बाहेर पडण्यासाठी लघुवित्तीय भूमिका महत्त्वपूर्ण ठरते.

1) सन्मानासह विकास

अमित भादुरी यांनी लिहिलेल्या "Development with Dignity" तसेच नोबेल पारितोषिक विजेते अमर्तसेन यांनी संसदेत दिलेल्या "Development with Social Justice" यावर दिलेल्या भाषणाचा परामर्श घेतला असता मानवास जीवन जगण्यासाठी जेवढा पैसा लागतो. तेवढा प्राप्त व्हावा परंतु याशिवाय प्रत्येक व्यक्तीस मान सन्मान प्राप्त झाला पाहिजे. प्रत्येकाला समाजात जगताना सन्मानाने जगता आले पाहिजे यासाठी पैसा मोजण्याची आवश्यकता नाही" म्हणजेच उपेक्षित दरिद्री, दुर्लक्षीत व्यक्तीच्या मनातून कमीपणाची, गरीबीची भावना काढून टाकून त्यांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी आणि यातून सामाजिक व राजकीय सक्षमीकरणासाठी आर्थिक साधन म्हणून 'लघू वित्त' महत्त्वपूर्ण ठरते.

2) रोजगार निर्मिती आणि दारिद्र्य निर्मूलन

स्वयंसहाय्यता गटांना पुरेशा प्रमाणात वित् पुरवठा केला गेला तर स्वयंरोजगार निर्मिती होऊन दारिद्र्य निर्मूलनास चालना मिळेल जेणे करुन देशाचे आर्थिक, सामाजिक आणि राजकीय स्वास्थ्य निर्माण होईल.

3) कृषीवरील रोजगाराचा भार कमी होईल

आजही ७२% जनता खेड्यामध्ये राहताना दिसूनयेते, हिच जनता रोजगारासाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे कृषी क्षेत्रावर अवलंबून असताना दिसते. यातील बराचसा रोजगार हा अतिरिक्त असताना दिसून येतो. यालाच छुपी बेरोजगारी' म्हणतात. त्याचा उत्पादनाच्या प्रक्रियेत वाढ व्हावी म्हणून काहीही सहभाग नसतो. अशा छुप्या बेरोजगारीला कमी करण्यासाठी लघुवित पुरवठा केला गेला तर पर्यायी रोजगार निर्माण होऊन कृषी क्षेत्रावरील रोजगाराचे अवलंबित्व कमी होऊन कृषी क्षेत्राचा विकासही साध्य होईल.

4) दुर्बलांचे सबलीकरण

लघुवित्त पुरवठा केला गेला तर समाजातील दुर्बल घटक म्हणून असणाऱ्या स्त्रिया, पुरुष, आरक्षितवर्गीय, अपंग, आर्थिकदृष्ट्या, दुर्बल घटक या सर्वांना आर्थिक मार्ग सापडून ते स्वत:च्या पायावर उभे राहतील. यातून त्यांचे सबलीकरण होईल. याचबरोबर निरक्षर किंवा अर्ध शिक्षीत, अर्ध प्रशिक्षीत लोकांना सुद्धा रोजगाराचेसाधन प्राप्त होईल.

5) सामाजिक व आर्थिक समानता

आजही भारतीय समाजात स्त्री-पुरुष विषमता असताना दिसून येते तसेच एका बाजूस 'आहे रे म्हणणारा श्रीमंत वर्ग आणि दुसारीकडे नाही रे म्हणणारा गरीब वर्ग' यांच्यातील आर्थिक दरी कमी

करण्यासाठी लघुवित्ताची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते की ज्याद्वारे स्त्रियांना यांना सुद्धा समाजा मध्ये सन्मानासह पुरुषांच्या बरोबरीने स्थान प्राप्त होईल याद्दष्टीने लघुवित्त महत्त्वपूर्ण भूमिकापार पाडताना दिसते. याचबरोबर ग्रामीण भागाचा विकास, कर्जबाजारीपणा कमी होण्यासाठी, बचतीला आणि गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी लघुवित्ताची भुमिका महत्त्वपुर्ण ठरते. याच संदर्भात बचत गटाच्या माध्यमातून लघुवित्ताचे महत्त्व स्पष्ट करताना प्रा. मुलयानी असे म्हणतात की, "ग्रामीण भागातील स्वयंसहाय्यता गटांची सरथा वाढत आहे आणि यामुळे रोजगार निर्मिती होऊन ग्रामीण अर्थव्यवस्था सबळ होत आहे."

वरीलप्रमाणे लघुवित्ताचे महत्त्व लक्षात घेतले तरी देखील लघुवित्त हे श्रीमंत वर्गातील लोकांच्या उत्पन्नाचे आणखीन एक साधन बनले गेले आहे. हा सर्वात महत्त्वाचा दोष आढळून आणखीन वंचित राहून विकासाच्या प्रवाहातून बाहेर फेकले जाणार की काय? असा प्रश्न निर्माण होतो. सर्व सामान्य लोकांना वित्त पुरवठा करणे हे लघुवित्त समोरील एक महत्त्वाचे आव्हान असताना दिसते.

उपाययोजनात्मक धोरणाचा विचार केला असता असे लक्षात येते की वित्त पुरवठा करताना ग्राहक खऱ्या अर्थाने गरजू आहे का? हे तपासणे महत्त्वपूर्ण ठरते.

याचबरोबर बचत गटाच्या किंवा व्यापक अर्थाने लघू वित्ताच्या संदर्भात राजकीय हस्तक्षेप टाळण्यात यावा, राजकीय पुढाऱ्यांनी राजकीय साधन म्हणून पाहता लघुवित्त हे विकासाचे साधन आहे हे लक्षात ठेऊन राजकीय हस्तक्षेप टाळावा. तेव्हा नक्कीच लघुवित्ताच्या माध्यमातून सर्व समावेशक सर्वांगीण विकारा साध्य होईल आणि पर्यायाने आर्थिक स्थिरतेसह (रोजगार निर्मिती, किंमत स्थिरता इ.) विकास होईल. यात संशय नाही !

संदर्भ


१) NABARD Annual Report 2015-16

२) अर्थव्यवस्था, सुंदरम, २०१०

३) कृषी अर्थशास्त्र २००७ डॉ. जे. पी. मिश्रा

४) नावार्ड वार्षिक अहवाल

५) महिला बचत गट - २००५ वैद्य मोहन वसंत

६) लोकराज्य २०१० रुद्रदल,रजून ६) योजना२००९ नोव्हेंबर

७) He IndianJournal of CommerceApril - June - 2008

८) दै. सकाळ - १ एप्रिल २०११